महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यापीठ रोड,शिवाजीनगर,पुणे ४११०१६

दुरध्वनी क्रं..०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

---

जा. क्र. शातंनिपु/अमुव/२०२४/ ४७८९ दिनांक: ८/१०/२०२४

अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह मनुष्यबळ भर्ती

अल्पसंख्यांक मुलींचे शासकीय वसतिगृह, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे ठोक रकमी कंत्राटी पद्धतीने नोंदणीकृत सेवा पुरवठादाराकडून अधिक्षक, लिपीक, शिपाई, सफाईगार व पहारेकरी (वॉचमन) पदे भरण्यासाठी निविदा, अणुविद्युत व दूरसंचार विभाग, शासकीय तंत्रनिकेतन पुणे येथे दिनांक: २४/१०/२०२४ पर्यंत मागविण्यात येत आहेत. याबाबतचा आवश्यक तपशिल अटी व शर्ती, इतर प्रपत्रे संस्थेच्या www.gppune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर जाहिरात फक्त महिलांसाठी आहे.

टीप: विहीत नमुन्यातील अर्ज व इतर प्रपत्रे शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथील अणुविद्युत व दुरसंचार विभागात प्रत्यक्षरित्या उपलब्ध होतील. संपर्क क्रमांक- ९९२२२७९४७४

(डॉ. राजेंद्र का. पाटील)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

To
Hande Madam
(2 Pages)
Bhange
8/10/24

महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यापीठ रोड,शिवाजीनगर,पुणे ४११०१६

दुरध्वनी क्र.,०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. शातंनिपु/अमुव/२०२४/ ४७८९ दिनांक: 8/10/24

## जाहिरात

विषय: अल्पसंख्यांक मुलींचे शासकीय वसतिगृह, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे ठोक रकमी कंत्राटी पद्धतीने मानधनावर महिला कर्मचारी पुरविण्याबाबत.

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासकीय तंत्रनिकेतन परिसर पुणे संचलित अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाकरीता ठोक रकमी कंत्राटी पद्धतीने मानधनावर तात्पुरत्यास्वरुपात अल्पसंख्यांक विभागाचा शासन निर्णय क्र. वसगृ-२०१२/प्र.क्र. १६८/का.८, दिनांक २१/०६/२०१३ नुसार आवश्यक कर्मचारी नोंदणीकृत सेवापुरवठादारांकडून भरण्याकरीता दिनांक: २४/१०/२०२४ पर्यंत निविदा शासकीय तंत्रनिकेतन, पुणे शिवाजीनगर येथे मागविण्यात येत आहेत.

आवश्यक पदांसाठी पात्रता तपशील खालीलप्रमाणे:

| अनु. क्र | पदनाम | पदसंख्या | मासिक मानधन रुपये | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अधिक्षक | १ | १५०००/- | वयोमर्यादा: वय ४२ वर्षापेक्षा जास्त नसावे<br>शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>अनुभव: अधिक्षक पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव |
| २ | लिपीक | १ | ८०००/- | वयोमर्यादा: वय ४२ वर्षापेक्षा जास्त नसावे<br>शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर तसेच, मराठी टंकलेखन ३० शप्रमि इंग्रजी ४० शप्रमि शासकीय/निमशासकीय परीक्षा मंडळाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | शिपाई | १ | ६५००/- | वयोमर्यादा: वय ४२ वर्षांपेक्षा जास्त नसावे<br>शैक्षणिक पात्रता: किमान १० वी पास व शरीर सुदृढ असावे |
| ४ | सफाईगार | २ | ६०००/- प्रत्येकी | वयोमर्यादा: वय ४२ वर्षांपेक्षा जास्त नसावे<br>शैक्षणिक पात्रता: --- |
| ५ | पहारेकरी (वॉचमन) | ४ | ९०००/- प्रत्येकी | वयोमर्यादा: वय ४२ वर्षांपेक्षा जास्त नसावे<br>शैक्षणिक पात्रता: किमान १० वी पास व शरीर सुदृढ असावे |

निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरीता इच्छुक पुरवठादारांकडून दोन लिफाफे पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. यामध्ये लिफाफा क्र. १ तांत्रिक लिफाफा (आवश्यक पात्रता संबंधित कागदपत्रे) असून लिफाफा क्र.२ हा दरांचा लिफाफा (कर्मचारी पुरविण्याबाबत दरमहा रक्कम नमूद करणे आवश्यक) आहे. तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या पुरवठादारांचे दरांचे लिफाफे उघडण्यात येतील. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची पुर्तता न करणा-या पुरवठादारांचा प्रस्ताव नाकारण्यात येईल.

टीप: १. महिला अधिक्षक पदासाठी अनुभव असणा-यास प्राधान्य देण्यात येईल. उमेदाराची निवड झाल्यानंतर त्यांनी वसतिगृहातील निवासस्थानामध्ये कायमस्वरुपी राहणे अनिवार्य आहे.

२. किमान वेतनाबाबतचा तपशील, प्रपत्रे, सविस्तर अटी व शर्ती संस्थेच्या संकेतस्थळावर www.gppune.ac.in वर उपलब्ध आहेत.

(डॉ. राजेंद्र का. पाटील)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

# निविदेतील व करारातील अटी व शर्ती

१. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे, निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे किंवा कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबतचे सर्वाधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

२. निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरीता इच्छुक पुरवठादारांकडून दोन लिफाफे पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. यामध्ये लिफाफा क्र. १ हा तांत्रिक लिफाफा असून लिफाफा क्र. २ हा दरांचा लिफाफा असेल. लिफाफा क्र. २ मध्ये कर्मचारी पुरविण्याबाबत दरमहा रक्कम नमूद करावयाची आहे. कामकाजाचे दर अल्पसंख्यांक विभागाचा शासन निर्णय क्र. वसगृ-२०१२/प्र.क्र. १६८/का.८, दिनांक २१/०६/२०१३ प्रमाणे नमूद करणे आवश्यक आहे.

३. तांत्रिक लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर करतांना विशेष सुचनांचे काळजीपुर्वक वाचन करावे व तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी प्रक्रिया सुरु असतांना ऐनवेळी कोणतीही कागदपत्रे सादर करता येणार नाहीत.

४. अर्जाचे विनापरतावा शुल्क रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) आणि रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) इतकी रक्कम विनव्याजी अनामत रक्कम म्हणून धनाकर्षाद्वारे भरणा करणे आवश्यक आहे. धनाकर्ष प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांच्या नावे पुणे येथे देय असणारा स्वतंत्ररित्या दोन्ही लिफाफ्यांसोबत सादर करावयाचा आहे. सदर लिफाफे (तांत्रिक व दराचा लिफाफा) धनाकर्षासह स्वतंत्ररित्या दिनांक: २४/१०/२०२४ रोजीपर्यंत अणुविद्युत व दुरसंदेशवहन विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे जमा करण्यात यावीत.

५. दरपत्रक उघडण्याचा दिनांक: २८/१०/२०२४ रोजी वेळ- सकाळी १०.३० वाजता ठिकाण: विश्वेश्वरैया सभागृह येथे आयोजित करण्यात येणार आहे.

६. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यापुर्वी पुरवठादाराने अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह इमारतीस प्रत्यक्ष भेट देणे

७. तांत्रिक लिफाफ्यांमधील कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या पुरवठादारांचेच दराचे लिफाफे उघडण्यात येतील. तांत्रिक लिफाफ्यांतील कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या पुरवठादारांचा प्रस्ताव नाकारण्यात येईल तसेच, नाकारण्यात आलेल्या पुरवठादारांचे धनाकर्ष परत करण्यात येतील.